**15:48:57**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. /५२/२०२४**
सगुबाई रंगराव चेचर वगैरे १ वि. इंदूबाई रंगराव पाटील वगैरे १
**नि.नं. २२/लगत / सी**

**उलटतपास अर्जदार तर्फे वकील श्री. व्ही. बी. माने यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरु,**

९.माझी जन्मतारीख सन १९७६ आहे. माझी जन्मतारीख २०.०९.१९७६ अशी आहे. माझे शिक्षण नववी पर्यंत झालेले आहे. मला मराठी लिहीता व वाचता थोडे येते. हे म्हणणे खरे आहे की, सगुबाई रंगराव चेचर व कौशल्या सुभाष निर्मळे या माझ्या मावश्या आहेत. माझ्या आईच्या वडिलांचे नाव पांडुरंग कृष्णा चव्हाण असे आहे. पांडुरंग यांना तीन मुली वारस आहेत. पांडुरंग चव्हाण हे हयात नाहीत. पांडुरंग चव्हाण हे दि. २६.०८.१९९८ रोजी वारले. माझ्या आजोबांना भाऊ नाहीत. माझ्या दोन मावशी म्हणजेच सगुबाई व कौशल्या यांनी माझ्या वडिलांच्या विरुद्ध व आईविरुद्ध रे क नं. १५५/२०१४ हा वाटपाकरिता दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये अजून काय मागणी केली होती हे मला आठवत नाही.

१०. (साक्षीदारास नि.१७ लगत कागदपत्र दाखविण्यात आले.) रंगराव दादा पाटील हे हयात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, रंगराव पाटील यांचेनंतर वारस म्हणून आमची नावे लागली होती. मी या कामी दाखल केले माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वाचून पाहिलेले आहे. मी दाखल केलेले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र मला थोडे वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावश्यांनी दाखल केलेल्या दाव्यात "प्रतिवादीनीं दि. ४.१२.१९८७ रोजी नोंदलेला दुय्यम निबंधक कार्यालयातील खरेदी दस्त क्र. १३८५ वादीच्या हक्कांवर बंधनकारक नाही असा ठराव व हुकूमनामा होवून मिळावा" अशी मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावश्यांनी दाखल केलेल्या दाव्यात "दावा मिळकतीचे सरस निरस मानाचे वाटप होवून वादीच्या २/३ हिस्सेचा तुटक कब्जा वादींना मिळावा" अशी मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की,वादीच्या वाटणीच्या दाव्यामध्ये माझा जबाब झाला होता.

११. त्यावेळी माझ्या मावशीनीं केलेला दावा मी वाचून पाहिला होता. त्या दाव्यामध्ये मावशींनी काय मागणी केली होती ते मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये माझ्या मावशीचा व साक्षीदारांचा जाब जबाब झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वतीने  माझा व माझ्या चुलत्यांचा जबाब देण्यात आला होता. तो दावा २८.०३.२०२३ रोजी मंजूर झाला किंवा कसे ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्याविरुद्ध आम्ही जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. अपील दाखल करतेवेळी कोर्टाने काय निकाल दिला होता ते मी वाचून बघितले होते किंवा कसे ते मला आता आठवत नाही. निकालपत्र वाचून न बघता मी अपील दाखल केले होते किंवा कसे ते मला आता आठवत नाही. मी निकालपत्र वाचून बघितले होते किंवा कसे ते मला आठवत नाही. सदर दाव्यातील निकालपत्र आजमितीपर्यंत मी माझ्या वकिलांकडून वाचून घेतले होते.

१२.(साक्षीदारास नि. ३ सोबतचे कागदपत्र दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रती मला मिळालेल्या नाहीत. मला इंग्रजी वाचता येत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, सदर निकालपत्रात "दावा खर्चासह मंजूर करण्यात आला आहे, प्रत्येक वादींना १/३ हिस्सा दावा मिळकतीमध्ये देण्यात आला असून प्रतिवादी क्र. १ व २-अ व त्यांचे वारस २- अ, ब यांना दावा मिळकतीमधील १/९ हिस्सा या प्रतिवादी क्र. १ व त्यांच्या वारसांना देण्यात आलेला आहे" असा मजकूर नमूद नाही. (साक्षीदारास नि. ३ सोबतचा हुकूमनामा दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे नाही की, आता मला दाखविलेल्या हुकूमनाम्याच्या कलम १० या दादीमध्ये "वादीचा दावा कोर्ट खर्चासह मंजूर व्हावा, प्रतिवादी ने ४.१२.१९८७ रोजी नोंदविलेला दुय्यम निबंधक कार्यालयातील खरेदी दस्त क्र. १३८५ वादीच्या हक्कांवर बंधनकारक नाही असा ठराव व हुकूमनामा होवून मिळावा, दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून वादीच्या २/३ हिस्साचा तुटक कब्जा वादीला मिळावा, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २० नियम १२ नुसार दरम्यानचे उत्पन्न

मिळावे" असा मजकूर नमूद नाही. माझ्या मावशींनी सदर प्रकरणात कोणता अर्ज दाखल केला आहे ते माझ्या लक्षात नाही.

१३.सदरचा अर्ज कशाबद्दल केला आहे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अर्ज कशाबद्दल केला आहे ते न पाहता मी या प्रकरणात माझे शपथपत्र या कामात दाखल केले आहे. सदर प्रकरणात वादी यांनी काय मागणी केली आहे ते मला आता आठवत नाही. मी दिलेल्या शपथपत्रामध्ये नमूद केलेला मजकूर मला आठवत आहे. माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये नमूद केलेला मजकूर मी निकाल पाहून कथन केलेला आहे. सदरचे निकालपत्र मी मराठीत वाचून घेतले होते. निकालपत्रामध्ये माझ्या मावशींना प्रत्येकी १/३ हिस्सा नमूद आहे ही बाब नमूद नाही. सदरचे निकालपत्र चुकीचे आहे हे मला म्हणायचे आहे. मला अपील दाखल करतेवेळी सदरचे निकालपत्र चुकीचे आहे असे समजले होते. हे म्हणणे खरे नाही की, निकालपत्रात प्रत्येकी १/३ हिस्सा नमूद नाही ही माझ्या मनाची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, नियमित दिवाणी दावा क्र. १५५/२०१४ या निकालपत्रामध्ये प्रत्येकी १/३ हिस्सा देण्यात आलेला आहे असे नमूद असताना मी माझ्या शपथपत्रामध्ये तसे नमूद नाही असे खोटे नमूद केले आहे. पांडु कृष्णा चव्हाण याला मारुती कृष्णा चव्हाण या नावाचा भाउ नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पांडु कृष्णा चव्हाण यांच्या नावे ज्या मिळकती होत्या त्या वडिलोपार्जित मिळकत होत्या. पांडु कृष्णा चव्हाण याने त्या मिळकती खरेदी घेतल्याबाबतचा कागद माझ्याकडे आहे. सदर मिळकती या सर्वे नं. २८४ राघू बाबू पाटील यांचेकडून दि. ७.३.१९४६ रोजी पांडु कृष्णा चव्हाण यांनी खरेदी घेतल्या होत्या. तसे खरेदीपत्र दाव्यामध्ये अथवा या प्रकरणामध्ये मी हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे कथन मी आजरोजी प्रथमच न्यायालयात करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पांडु कृष्णा चव्हाण यांच्या तीनही मुलींना कोर्टाने समान हक्क दिला. हे म्हणणे खरे नाही की, तशी बाब मला माहीत असताना मी ती बाब नसल्याचे खोटे सांगत आहे. रे क. नं.

१५५/२०१४ च्या हुकुमनामेमध्ये जी दुरुस्ती मागितली आहे ती मंजूर झाल्यामुळे काय बदल होणार आहे ते मला सांगता येत नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर बदल काय होणार आहे याची माहिती नसताना मी तसा बदल होणार आहे असे खोटे नमूद केले आहे. त्या दाव्यात हजर असलेले रे क नं. १५५/२०१४ चे निकालपत्र व हुकूमनामा हा मे. न्यायालयाने पारीत केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये हस्तदोषामुळे झालेली चुक वादींनी दुरुस्त करून मागितलेली आहे. या प्रकरणात वादी यांनी दाखल केलेली नि.१८ लगतची नोटीस मी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सदरचे प्रकरण हे महसुल खात्याकडे पाठविले नाही असे खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावशीने कार्यालयीन झालेली चुक दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणात माझ्या मावशीची काही चुक नसताना खोटया आशयाचे म्हणणे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच खोटया आशयाचे शपथपत्र दाखल करून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

16:50:48

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा

दि. १७/०२/२०२६.